# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः09.05.2024** **वारःगुरुवार**

---

1. **लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यासाठी सर्वच पक्षांकडून जोरदार प्रचार**
2. **विरोधकांकडे नीती, नियत आणि नेताही नसल्याची भाजपा नेते अमित शहा यांची टीका; तर केंद्र सरकारचं धोरण शेतकरी हिताचं नसल्याचा ज्येष्ठ नेते शरद पवार यांचा आरोप**
3. **विधान परिषदेच्या 4 जागांसाठी येत्या 10 जून रोजी मतदान आणि**
4. **छत्रपती संभाजीनगर आणि धारशिवच्या नामांतराला आव्हान देणाऱ्या याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळल्या**

**प्रचार**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातल्या प्रचारासाठी आता तीनच दिवस शिल्लक राहिले असल्यामुळे सर्वच राजकीय पक्षांनी प्रचारसभांचा धडाका लावला आहे. चौथ्या टप्प्यात पुणे मावळ शिरूरसह राज्यातल्या औरंगाबाद, जालना, बीड, नंदुरबार, जळगाव, रावेर, अहमदनगर आणि शिर्डी या मतदारसंघांमध्ये, येत्या 13 मे रोजी मतदान होणार आहे. त्यामुळे प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यात सर्वच राजकीय पक्षांचे आघाडीचे नेते जाहीर सभा, बैठका, प्रचार फेऱ्या या माध्यमातून मतदारांना आवाहन करत आहेत.

केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपाचे वरिष्ठ नेते अमित शहा यांनी काल जालना लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार रावसाहेब दानवे यांच्या प्रचारार्थ जालन्यात जाहीर सभा घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला सुरक्षित, आणि समृद्ध बनवलं असून जगात देशाचा सन्मान वाढवण्याचं काम केलं आहे, असं शहा म्हणाले. पंतप्रधान मोदी यांच्या कार्यकाळात केलेल्या कामांची माहिती देतानाच त्यांनी विरोधकांवर जोरदार टीका केली. इंडिया आघाडीकडे नीती, नियत आणि नेताही नाही, असं अमित शहा म्हणाले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, रावसाहेब दानवे यांच्यासह विविध नेते यावेळी उपस्थित होते.

नाशिकचे महायुतीचे उमेदवार हेमंत गोडसे यांच्या प्रचारासाठी काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांचा मेळावा घेण्यात आला. देशात भाजपाची सत्ता आल्यास राज्यघटना बदलण्यात येईल, अशी अफवा विरोधक पसरवत आहेत. मात्र प्रत्यक्षात कोणत्याही प्रकारे संविधान बदललं जाणार नाही असं शिंदे यांनी स्पष्ट केलं. हे सर्वसामान्यांचं सरकार असल्यामुळे ते कायम सामान्यांसाठी धावून येईल, असंही शिंदे यावेळी म्हणाले. अहमदनगर जिल्ह्यात संगमनेर इथंही मुख्यमंत्र्यांनी प्रचारसभा घेतली. घाट माथ्यावरचं समुद्राकडे वाहून जाणारं पाणी अडवून, ते नगर, नाशिक आणि मराठवाड्याला देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचं शिंदे म्हणाले. बाळासाहेब ठाकरे यांचं स्वप्न मोदी सरकारनं पूर्ण केलं आहे असंही शिंदे म्हणाले.

पुण्यात भाजपा उमेदवार मुरलीधर मोहोळ यांचं संकल्पपत्र पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आलं. विस्तारित मेट्रो मार्गांची आखणी, सार्वजनिक वाहतुकीचं सक्षमीकरण, समान पाणीपुरवठा योजना, जलस्त्रोतांचं पुनरुज्जीवन यासह इतर आश्वासनं यात देण्यात आली आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धुळे जिल्ह्यात शिरपूर इथं महायुतीच्या उमेदवार डॉ. हीना गावित यांच्या प्रचारासाठी मेळावा घेतला. भाजपा सरकारच्या काळात देशातल्या सर्वच घटकांसाठी कल्याणकारी योजना राबवल्या जात असल्याचं सांगून विरोधकांकडे मुद्देच उरले नाहीत म्हणून ते संविधान बदलण्यासंदर्भात खोटा प्रचार करत आहेत अशी टीका फडणवीस यांनी केली.

केंद्रातील मोदी सरकारचं धोरण शेतकरी हिताचं नसल्याची टीका राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी अहमदनगर इथल्या प्रचारसभेत केली. तिथले महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या प्रचारासाठी घेतलेल्या या सभेला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे संजय राऊत, काँग्रेसचे बाळासाहेब थोरात आदी उपस्थित होते. धुळ्यात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी पत्रकार परिषद घेतली. धुळे आणि नंदुरबार दोन्ही लोकसभा मतदार संघातल्या जनतेमध्ये भारतीय जनता पक्षाबद्दल प्रचंड रोष आहे. त्यामुळे यंदा धुळे, नंदूरबारमध्ये भाजपचा दारुण पराभव होईल असं पटोले यावेळी म्हणाले.

उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे नेते उद्धव ठाकरे यांनी काल मावळ मतदार संघात जाहीर सभा घेतली. गेल्या दहा वर्षात महाराष्ट्रातून जे उद्योगधंदे बाहेर नेले; ते गेलेलं वैभव इंडिया आघाडीचं सरकार सत्तेवर आल्यास पुन्हा उभं करून दाखवू असा विश्वास ठाकरे यांनी व्यक्त केला. मावळ लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचारार्थ आयोजित या सभेला माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, आम आदमी पार्टीचे नेते संजय सिंह यांच्यासह महाविकास आघाडीतील घटक पक्षाचे नेते उपस्थित होते. गुजराती लोकांनी जर मराठी माणसाला घर किंवा नोकरी नाकारली तर त्यांना महाराष्ट्राबाहेर जावं लागेल, असा इशाराही ठाकरे यांनी दिला.

**<u>निवडणूक</u>**

राज्य विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाची निवडणूक, केंद्रीय निवडणूक आयोगानं काल जाहीर केली. मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर, नाशिक विभाग शिक्षक आणि मुंबई शिक्षक मतदारसंघ अशा 4 जागांसाठी ही निवडणूक होणार आहे. मुंबई पदवीधर मतदार संघाचे विलास पोतनीस, कोकण पदवीधर मतदारसंघाचे निरंजन डावखरे, नाशिक विभाग शिक्षक मतदारसंघाचे किशोर दराडे, आणि मुंबई शिक्षक मतदारसंघाचे कपिल पाटील येत्या 7 जुलै रोजी विधान परिषदेतून निवृत्त होत आहेत. त्यामुळे आयोगाने हा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. या निवडणुकीसाठी येत्या 15 मे रोजी अधिसूचना जारी होईल. 22 मे पर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येईल. 24 मे रोजी अर्जांची छाननी होईल. आणि 27 मे ही उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख आहे. 10 जूनला मतदान आणि 13 जूनला मतमोजणी होईल, असं निवडणूक आयोगानं प्रसिद्धी केलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

**<u>मुंबई उच्च न्यायालय</u>**

औरंगाबाद जिल्ह्याचं नामांतर छत्रपती संभाजीनगर आणि उस्मानाबाद जिल्ह्याचं धाराशिव असं नामांतर करण्याच्या सरकारच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिका मुंबई उच्च न्यायालयाने काल फेटाळल्या. मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती देवेंद्र उपाध्याय आणि न्यायमूर्ती अरीफ डॉक्टर यांनी यावर निर्णय दिला. सरकारच्या या निर्णयात बेकायदेशीर असं काही नसल्याचं त्यांनी सांगितलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी न्यायालयाच्या या निर्णयाचं स्वागत केलं आहे. संभाजीनगर हे नाव सर्वप्रथम बाळासाहेब ठाकरे यांनीच दिलं होतं; या निर्णयान बाळासाहेब

ठाकरे यांचं स्वप्न खऱ्या अर्थाने पूर्ण झालं आहे असं मुख्यमंत्री शिंदे यांनी छत्रपती संभाजी नगर इथं वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. हा जनभावनेचा विजय असल्याचं शिंदे म्हणाले.

**<u>परदेशी प्रतिनिधी</u>**

भारतासारख्या लोकशाही असलेल्या देशात निवडणूक प्रक्रिया ही महत्त्वपूर्ण बाब असून मतदारांचा मतदानासाठीचा उत्साह निवडणूक आयोगानं राबवलेल्या जनजागृती मोहिमेचं यश आहे असं मत विविध देशातील प्रतिनिधींनी काल मुंबईत व्यक्त केलं. निवडणूक प्रक्रियेच्या पाहणीसाठी आलेल्या परदेशी शिष्टमंडळांच्या प्रतिनिधींनी काल राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम यांची भेट घेतली आणि भारतातील निवडणूक प्रक्रियेविषयी माहिती जाणून घेतली. त्यावेळी त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. या शिष्टमंडळानं नुकतीच रायगड इथल्या मतदान केंद्रावर जाऊन मतदान प्रक्रियेची पाहणी देखील केली.

**<u>मतदार जनजागृती-नवीमुंबई</u>**

नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे मतदार जनजागृतीसाठी स्वीप अंतर्गत वेगवेगळे उपक्रम राबवण्यात येत आहेत. महापालिकेच्या परिवहन विभागानं चालक, वाहक, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना 'माझे मत माझा अधिकार' आणि 'मी मतदान करणारच' असा संदेश दोन्ही बाजूने छापलेल्या गांधी टोप्या वितरित केल्या आहेत. त्यांचा वापर चालक, वाहकांसह इतर कर्मचारी अधिकाऱ्यांकडून केला जात असल्यामुळे बसमध्ये प्रवाशांमध्ये मतदान जनजागृती होत आहे. याबरोबरच परिवहन विभागाच्या विविध नियंत्रण कक्षांवर आणि आगारांमध्ये सेल्फी पॉईंट उभारण्यात आले आहेत. त्याद्वारे मतदानाबाबतचे संदेश प्रसारित करून नागरिकांना मतदानासाठी प्रोत्साहित केलं जात आहे.

**<u>प्रशिक्षण माहिती जनसंपर्क</u>**

शासकीय सेवेत काम करीत असताना नागरिक केंद्री काम करावे लागते. अशावेळी संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांना वेळोवेळी कामासंदर्भातील प्रशिक्षण मिळाले पाहिजे. असं मत भारतीय लोक प्रशासन संस्थेच्या महाराष्ट्र शाखेचे अध्यक्ष आणि माजी मुख्य सचिव स्वाधिन क्षत्रिय यांनी व्यक्त केलं. भारतीय लोक प्रशासन संस्थेच्या महाराष्ट्र शाखेनं, माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांचा पाच दिवसांचा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला आहे. त्याचा प्रारंभ काल मुंबईत झाला त्यावेळी क्षत्रिय बोलत होते.

**<u>हवामान</u>**

राज्यात काल सर्वात जास्त कमाल तापमान अकोला इथं 43 पूर्णांक 7 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. आज कोकणात हवामान कोरडं राहील. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. विदर्भात तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा आणि गारांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.